दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३४५ वा ● गुरुवार, ता. ०३ जुलै २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## मंत्रोच्चाराने सोयाबीनचे उत्पादन वाढते?

### कृषी विद्यापीठाने भूमिका स्पष्ट करावी

**पुणे । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक प्रतिष्ठान व वनराई फाउंडेशनतर्फे देण्यात आलेल्या प्रयोगशील शेतकरी पुरस्कार वितरण सोहळ्यात सेवा सदन संस्थेच्या अध्यक्षा व सामाजिक कार्यकर्त्या कांचन गडकरी यांनी सोयाबीनच्या उत्पादनात मंत्रोच्चारामुळे वाढ झाल्याचा दावा केला. मात्र, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) या दाव्याचा जोरदार निषेध करत हा संपूर्ण दावा अशास्त्रीय व दिशाभूल करणारा असल्याचे स्पष्ट केले आहे. अंनिसने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात गडकरी यांच्या विधानाचा समाचार घेत, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि पुरस्कार देणाऱ्या संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी यावर तातडीने भूमिका स्पष्ट करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अंनिस म्हणते काय? अंनिसच्या प्रसिद्धीपत्रकात नमूद आहे की, गडकरी यांनी म्हटले की, शेतात बियाणे पेरल्यापासून धर्मसंस्कार केले तर शेती भरघोस उत्पादन देते. आम्ही आमच्या धापेवाड्यातल्या शेतीत सोयाबीनला श्री सूक्त व मंत्रोच्चार ऐकवले. त्यामुळे उत्पादन वाढले. या विधानावर टीका करत अंनिसने म्हटले की, हे विधान शास्त्राच्या कसोटीवर टिकणारे नाही. ‘‘सोयाबीनचे झाड मंत्र ऐकून उत्पादन वाढवते, हा दावा केवळ अंधश्रद्धा पसरवणारा आहे.‘‘ अंनिसने संत ज्ञानेश्वरांच्या वचनाचा संदर्भ देत स्पष्ट केले की, मंत्रेची वैरी मरे, तर का बांधावी कट्यारे? म्हणजेच मंत्राने काही साध्य होत असेल, तर मग इतर शास्त्रीय उपायांची गरजच काय? शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ! अंनिसने अशी टीका केली की, शेतीमधील तांत्रिक अडचणी, बाजारातील अनिश्चितता, हमीभावाची बोंब यामुळे आधीच शेतकरी अडचणीत आहे. अशा वेळी मंत्रोच्चाराच्या नावाखाली उपाय सांगणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. भारताच्या मागे पडण्याचे धोके प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे की, जगातील ४०% सोयाबीन उत्पादन ब्राझीलमध्ये, २८% अमेरिका आणि १२% अर्जेंटिनामध्ये होते; भारताचा वाटा केवळ ३%. हे आकडे स्पष्ट दाखवतात की उत्पादनवाढीसाठी मंत्र नव्हे, तर आधुनिक तंत्रज्ञान आवश्यक आहे. ‘‘जगभरातील शेतकरी कृत्रिम बुद्धिमत्ता व वैज्ञानिक पद्धतींचा वापर करत असताना, भारतात अशा अशास्त्रीय गोष्टींच्या चर्चा होणे हे चिंताजनक आहे‘‘, असे अंनिसने म्हटले आहे. विद्यापीठाने आणि संघटनांनी आपली भूमिका स्पष्ट करावी अंनिसच्या नंदिनी जाधव, मिलिंद देशमुख, राहुल थोरात, डॉ. हमीद दाभोलकर, राजीव देशपांडे आदी कार्यकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, वेळीच विरोध न केला, तर उद्या कृषी विद्यापीठांमध्ये मंत्रोपचारावर आधारित कोर्सेस सुरू होतील, हेही नवल राहणार नाही. त्यामुळे पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, शेतकरी संघटना व सामाजिक संस्थांनी या प्रकाराविरोधात माफक नव्हे, ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे, अशी मागणी अंनिसने केली आहे.

विज्ञान निर्भयता नीती

## विधवा दिनानिमित्त महिलांसाठी सजग पाऊल

### अनु अग्रवाल फाउंडेशनचा प्रेरणादायी उपक्रम




**मुंबई । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त एक सशक्त आणि संवेदनशील गोष्टींचा जागर करणाऱ्या कार्यक्रमात सहभाग घेण्याचा सन्मान लाभल्याचे अनु अग्रवाल फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. संयुक्त राष्ट्रांच्या मान्यतेने साजरा होणारा २३ जुन हा दिवस, समाजाच्या दुर्लक्षित घटकांकडे लक्ष वेधतो. विशेषतः विधवा महिलांकडे, ज्या अनेकदा सामाजिक कलंकामुळे दुर्लक्षित राहतात. अनु अग्रवाल फाउंडेशन (AAF) अशा महिलांसाठी नवा आशेचा किरण बनून पुढे येत आहे. सामाजिक दबाव, वेदना आणि एकटेपणाच्या कुशीवर उभ्या असलेल्या या महिलांमध्ये नवचैतन्य निर्माण करणे, आत्मबळ जागवणे आणि पुनर्प्रेरणा देणे, हे फाउंडेशनचे ध्येय आहे. ‘‘सक्षमीकरण हे चैन नाही, तर माणसाचा मूलभूत हक्क आहे‘‘, असे मत फाउंडेशनने व्यक्त केले. या उपक्रमांतर्गत महिलांना मानसिक आधार, वैयक्तिक सशक्तीकरणासाठी विविध साधने, आणि आत्ममूल्य जागवण्यासाठी मार्गदर्शन दिले जाते. या प्रवासात दुःखाला बळात रूपांतरित करण्याची आणि एकटेपणाला भगिनीभावाच्या शक्तीत बदलण्याची प्रेरणा दिली जाते. समाजात बहुतेक वेळा विधवा महिलांचे आयुष्य संकुचित चौकटीत बंदिस्त केले जाते, परंतु AAF त्या चौकटी मोडत सन्मानाने जगण्याचा अधिकार पुनर्स्थापित करत आहे. आंतरराष्ट्रीय विधवा दिनाचे औचित्य साधून, च्या या प्रेरणादायी कार्यास शुभेच्छा देत, या लढ्यात सामील होण्याचे आवाहन अभिनेत्री अनु आगरवाल यांनी सर्व नागरिकांना केले आहे.




## ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवर पत्रकारांचा गौरव करणारा वार्षिक पुरस्कार वितरण सोहळा दिमाखात पार पडला. या सोहळ्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत खास अतिथी म्हणून ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि माजी राज्यसभा खासदार डॉ. नरेंद्र जाधव आणि परिषदेचे अध्यक्ष एस.एम. देशमुखही उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार तर भरत जाधव यांना विशेष सन्मान प्रदान करण्यात आला. तसेच महेश म्हात्रे, अभिजित करांडे, अमेय तिरोडकर, पांडुरंग पाटील, सर्वोत्तम गावस्कर, दिनेश केळुस्कर, सीमा मराठे, बाळासाहेब पाटील, शर्मिला कलगुटकर आणि भरत निगडे या नामवंत पत्रकारांनाही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना शरद पवार म्हणाले, ‘‘पत्रकारितेच्या क्षेत्राशी माझाही थोडकासा संबंध आला होता. स्व. बाळासाहेब ठाकरे, मी आणि आमचे काही मित्र मिळून एक मासिक सुरू केले होते. प्रत्येकाने ५-५ हजार रुपये गुंतवणूक केली होती आणि टाईम मासिकाच्या धर्तीवर अंक काढण्याचा मानस होता. मात्र पहिलाच अंक न दिसता गेला आणि तो प्रयोग अपयशी ठरला. हा एक गमतीदार अनुभव असला तरी पत्रकारिता हे अत्यंत जबाबदारीचे आणि लोकशाहीतील महत्त्वाचे क्षेत्र आहे.‘‘ पुढे बोलताना त्यांनी पत्रकारितेची मूल्य जपत लोकशाहीत भरीव योगदान देण्याचे आवाहन केले आणि सर्व सन्मानित पत्रकारांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. कार्यक्रमाला विविध भागांतून आलेले पत्रकार, साहित्यिक, संपादक आणि समाजमाध्यमांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राज्यात १.३५ लाख कोटींच्या गुंतवणूक प्रस्तावांना मंजुरी

### १ लाख रोजगार संधी निर्माण होणार




**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीने ₹१ लाख ३५ हजार ३७१ कोटी ५८ लाख इतक्या गुंतवणूक प्रस्तावांना मान्यता दिली आहे. या गुंतवणुकीमुळे सुमारे १ लाख प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या निर्णयामुळे राज्यातील थ्रस्ट सेक्टर तसेच उच्च तंत्रज्ञानावर आधारित उद्योगांना चालना मिळणार असून तांत्रिक नवकल्पना, संशोधन आणि विकास या क्षेत्रांना प्रोत्साहन मिळणार आहे. उद्योग विभागांतर्गत ‘विशाल व अतिविशाल प्रकल्पांना सामूहिक प्रोत्साहन योजना’ आणि ‘थ्रस्ट सेक्टर धोरणा’च्या अनुषंगाने प्रोत्साहने मंजूर करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची १२ वी बैठक आज विधानभवनात पार पडली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत हेही उपस्थित होते. यावेळी मुख्य सचिव राजेशकुमार, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वस्त्रोद्योग विभागाच्या सचिव ए. शैला, उद्योग विभागाचे सचिव अन्बळगन पी., विकास आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह आणि औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलरासू आदी अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. ही गुंतवणूक मंजुरी केवळ आर्थिक वाढीसाठीच नव्हे, तर कौशल्याधारित रोजगार निर्माण, नवोन्मेष आणि आधुनिक औद्योगिकीकरणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


## अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांचा वंचित बहुजन आघाडीतर्फे सन्मान



**अहमदनगर । प्रतिनिधी**

अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे यांची नाशिक येथे बदली झाल्याच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या प्रसंगी खैरे यांना तथागत गौतम बुद्ध यांची प्रतिमा आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी खैरे साहेबांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना सांगितले की, ‘‘खैरे साहेब हे शांत स्वभावाचे, संवेदनशील अधिकारी असून त्यांनी कर्तव्य बजावत असताना सामान्य जनतेचे प्रश्न समजून घेऊन निस्वार्थपणे न्याय दिला. अशा अधिकाऱ्यांची उपस्थिती ही जिल्ह्यासाठी मोठे भाग्यच आहे.’’ या सन्मान सोहळ्याला जिल्हा सल्लागार जे.डी. शिरसाठ, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, युवा शहर अध्यक्ष ॲड. योगेश गुंजाळ तसेच वंचित बहुजन आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थितांनी खैरे यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्या कार्याची आठवण कायम राहील, असे मनोगत व्यक्त केले.

## एमआयडीसी परिसरात रोड सेफ्टीसाठी अभिजीत वाघमारे यांचे मोलाचे योगदान




**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

एमआयडीसी, सिडको परिसरातील अपघातांची मालिका रोखण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अभिजीत विठ्ठलराव वाघमारे यांनी नुकतेच विशेष रोड सेफ्टी ड्राईव्ह राबवले. जवळपास ८ ते १० दिवस त्यांनी रात्रीच्या वेळेत पेट्रोलिंग करून विविध उपाय योजना केल्या.

या उपक्रमामुळे अपघातांचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले असून, त्यांचे कार्य पोलिस विभागानेही गौरवले आहे. एमआयडीसी परिसरात दररोज रात्री आणि पहाटेच्या वेळेस मोठ्या प्रमाणावर ट्रक्स आणि दुचाकींची वाहतूक असते. कामगार वर्ग बहुसंख्येने याच वेळेत ये-जा करत असल्यामुळे येथे अपघातांचे प्रमाण वाढले होते. काही महिन्यांपूर्वी येथे सहा गंभीर अपघात झाले होते, ज्यामध्ये एक युवकाचा मृत्यू झाला होता.


अभिजीत वाघमारे यांनी यावर उपाय शोधत रोड सेफ्टीसंदर्भात जनजागृती, पेट्रोलिंग, वाहतुकीच्या नियमनासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांनी सांगितले की, ‘‘ भागातील रस्ते नेहमीच ब्लॅक स्पॉट म्हणून ओळखले जातात. येथे रहदारी कमी असली तरी दुचाकीस्वार भरधाव वेगात असतात. यामुळेच अपघात घडतात. शिवाय, या परिसरातील अनेक कंपन्या फक्त कंपनी अंतर्गत सुरक्षेवर लक्ष केंद्रित करतात, परंतु बाह्य रस्त्यांवरील सुरक्षेची जबाबदारी घेत नाहीत.’’ या उपक्रमासाठी एमआयडीसी पोलिस स्टेशनकडून भरभरून सहकार्य लाभले. पोलीस निरीक्षक कल्याणकर साहेब आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक के. एस. लहाने यांचे त्यांनी विशेष आभार मानले आहेत. याच कार्याबद्दल पोलिस ठाण्याकडून अधिकृत प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. रोड सेफ्टीसाठी स्थानिक नागरिकांनीही पुढाकार घ्यावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वाघमारे यांनी केले.

## ओढेनाले बुजवून दिलेल्या बांधकाम परवानग्या अंगलट

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर शहरातील नैसर्गिक ओढे व नाले बुजवून दिलेल्या बेकायदेशीर बांधकाम परवानग्यांच्या प्रकरणात महापालिकेच्या नगररचना विभागाची गैरकारभार अंगलट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. तत्कालीन नगररचना अधिकारी राम चारठाणकर यांनी नियमबाह्यरीत्या दिलेल्या परवानग्यांमुळे शहरात अनेक ठिकाणी पूर नियंत्रण रेषा दुर्लक्षित करत थेट नाल्यांवरच बांधकामे झाल्याचे उघड झाले आहे. सामाजिक कार्यकर्ते शशिकांत चंगेडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून या प्रकरणाचा सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांनी लोकायुक्त कार्यालयाकडे सादर केलेल्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने याची गंभीर दखल घेतली असून येत्या ८ जुलै २०२५ रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या कार्यालयात सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. ही सुनावणी छत्रपती संभाजीनगर रोडवरील प्राधिकरणाच्या कार्यालयात होणार आहे. या सुनावणीसाठी शशिकांत चंगेडे यांना अधिकृतरित्या हजर राहण्याचे पत्र पाठवण्यात आले आहे. तसेच, महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक व संबंधित अधिकारी यांनाही या सुनावणीस उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शहरातील पावसाळ्यातील वाढत्या पूरस्थितीचा आणि जलनिकासी व्यवस्थेवरील ताणाचा विचार करता, नैसर्गिक नाल्यांमध्ये अडथळा निर्माण करणाऱ्या अनधिकृत किंवा नियमबाह्य परवानग्यांची जबाबदारी निश्चित करण्याच्या दृष्टीने ही सुनावणी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या सुनावणीतून पुढे काय निर्णय घेतले जातात याकडे संपूर्ण शहरवासियांचे लक्ष लागून राहिले आहे.


## किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी वावर्ले विद्यालयात मार्गदर्शन शिबिर




**रायगड। प्रतिनिधी**

जिल्ह्यातील न्यू इंग्लिश स्कूल, वावर्ले (ता. खालापूर) येथे किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. बुधवारी ता. २ जुलै रोजी पंचायत समिती खालापूर आणि रायगड जिल्हा परिषद यांच्या वतीने एकात्मिक बाल विकास योजना अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका चांदणे एम.आर. होत्या. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून हेमंत घरत (अध्यक्ष, युवा पुरोगामी सामाजिक संस्था, अलिबाग), डॉ. दीपक खाडे, ॲड. भाविक ओसवाल (कायदेशीर सल्लागार), ॲड. श्वेता भोईर आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत ज्येष्ठ शिक्षक पाटील व्ही.जी. यांनी केले, तर प्रास्ताविक मुख्याध्यापिका चांदणे एम.आर. यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी नियोजन सहाय्यक शिक्षक आडसरे एस.सी., पवार एस.यू. आणि दरेकर वाय.डी. यांनी केले. या कार्यक्रमाला परिसरातील अंगणवाडी सेविका प्रणिता भद्रिके, रेश्मा मांडे, आदिती मांडे, सारिका सुर्वे, ज्योती झोरे आणि विमल जाधव यांचीही उपस्थिती लाभली. मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना किशोरवयातील शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बदल तसेच कायदेशीर अधिकार व जबाबदाऱ्यांविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी पाटील व्ही.जी. यांनी उपस्थितांचे आभार मानले. उपस्थित मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना भावी आयुष्याच्या वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणा मिळाली.

## रोमी लिपी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याची ‘ग्लोरोलिअ’ची मागणी




**मडगाव । प्रतिनिधी**

गोवा राज्यातील शैक्षणिक अभ्यासक्रमात रोमी लिपीचा समावेश करावा. राज्यात अल्पसंख्याक आयोगाची स्थापना करावी, अशी मागणी ग्लोबल रोमी लिपी अभियानने केली असून आगामी विधानसभा अधिवेशनात या दोन्ही मागण्यांवर ठराव संमत व्हावा यासाठी सर्वपक्षीय आमदारांच्या भेटी घेतल्या जात असल्याचे अभियानाच्यावतीने कळवित आले. ग्लोबल रोमी लिपी अभियानने रोमी लिपीलाही घटनेने दिलेले हक्क मिळावेत, अशी मागणी केली. यावेळी अभियानाचे अध्यक्ष केनेडी अफोन्सो, सचिव मायकल ग्रॅसिअस आणि इतर सदस्य उपस्थित होते. अफोन्सो यांनी सांगितले की, राज्यातील पावसाळी अधिवेशनाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत आणि याच अधिवेशनात रोमी लिपीचा शैक्षणिक अभ्यासक्रमात वापर करण्याबाबत तसेच राज्यात अल्पसंख्याक आयोगाच्या निर्मितीबाबत ठराव संमत व्हावा, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे.

### महाराष्ट्राची पॉवरलिफ्टिंगमध्ये अभिमानास्पद कामगिरी

# राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सांघिक विजेतेपद

**अहमदनगर । प्रतिनिधी**

दावणगिरी (कर्नाटक) येथे २२ ते ३० जून २०२५ दरम्यान पार पडलेल्या राष्ट्रीय पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राने अभिमानास्पद कामगिरी करत २६० गुणांसह सांघिक विजेतेपद पटकावले आहे. सीनियर गटात पुरुष विभागात ४७ व महिला विभागात ४४ गुणांसह महाराष्ट्राने अव्वल स्थान मिळवले. तसेच सब-ज्युनियर आणि ज्युनियर गटात ४४ गुणांसह संघाने उपविजेतेपदही पटकावले.



**प्रमुख पदक विजेते : सीनियर पुरुष गट :**

९३ कि.ग्रा. निलेश गराटे (मुंबई उपनगर) ८७१ कि.ग्रा. वजन उचलून राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक. १०५ कि.ग्रा. गणेश तोटे (रायगड) ८७५ कि.ग्रा. कास्य पदक. १२० कि.ग्रा. संकेत चव्हाण (मुं.उ) ८३२.५ कि.ग्रा. रौप्य पदक. १२०+ कि.ग्रा. सागर मिराशी (मुं.श) ८४० कि.ग्रा. सुवर्णपदक.

**सब-ज्युनिअर पुरुष :**

आदित्य मिस्त्री (मुं.श) ४९० कि.ग्रा. सुवर्ण. मयूर कोनकर (ठाणे) ५६० कि.ग्रा. सुवर्ण. ईशान सिंग (मुं.उ) ६५२.५ कि.ग्रा. सुवर्ण.

**ज्युनिअर पुरुष :**

विराज पावसकर (मुं.उ) ४८७ कि.ग्रा. सुवर्ण. चैतन्य पंदेकर (मुं.उ) ६७२ कि.ग्रा. रौप्य. जस्वीरसिंग भाटिया (संभाजीनगर) ७९० कि.ग्रा. रौप्य.

**सीनियर महिला गट :**

काजल भाकरे (ठाणे) ३९० कि.ग्रा. रौप्य. सुश्मिता देशमुख (ठाणे) ४०५ कि.ग्रा. रौप्य. समृद्धी देवळेकर (मुं.श) ५०८ कि.ग्रा. राष्ट्रीय विक्रमासह सुवर्ण. प्रेरणा साळवी (मुं.श) ५३५ कि.ग्रा. सुवर्ण. निवेदिता खारकर (मुं.श) ५१० कि.ग्रा. रौप्य. आश्लेषा गुडेकर (मुं.उ) ५५२.५ कि.ग्रा. रौप्य.

**सब-ज्युनिअर महिला :**

अचलकुमारी राजभर (रायगड) २५२.५ कि.ग्रा. रौप्य. सेजल बेलवलकर (मुं.उ) २२७.५ कि.ग्रा. रौप्य. तपस्या मते (पुणे) ३२२.५ कि.ग्रा. रौप्य. सई शिंदे (पुणे मुं.श) ३६० कि.ग्रा. रौप्य. अनुराधा राठोड (मुं.श) ३८२.५ कि.ग्रा. सुवर्ण.

**ज्युनिअर महिला :**

सेजल मोईकर (पुणे) ५०० कि.ग्रा. रौप्य. मृणाली भोग (पुणे) ४०५ कि.ग्रा. या स्पर्धेसाठी संजीवन भास्करन, संजय सरदेसाई, सूर्यकांत गर्दे, अनंत चाळके, राजहंस मेंदळे, रक्षा महाराव व डेव्हिड मकासरे यांचे मार्गदर्शन लाभले. ही माहिती महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सहसचिव डेव्हिड मकासरे यांनी दिली. महाराष्ट्राच्या या यशामुळे राज्यातील खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

## डॉ.पाउुलबुधे पॉलिटेक्निक कॉलेजची उत्कृष्ट निकालाची परंपरा

**अहमदनगर । विजय मते**



सोलापूर रोडवरील नारायणडोह येथील डॉ. एन. जे. पाऊलबुधे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी एमएसबीटीईच्या उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले असून, संस्थेच्या उत्कृष्ट निकालाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. ग्रामीण भागात तांत्रिक शिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी समर्पण आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर अत्यंत उज्वल कामगिरी केली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या परीक्षेत महाविद्यालयाच्या विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी उच्च गुण मिळवत प्रथम श्रेणीत यश संपादन केले आहे. संगणक शाखेतील ऋषिकेश पागीरे याने ९०.९% गुण मिळवून संपूर्ण कॉलेजमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. तर मुलींमध्ये स्नेहल ठोंबरे हिने ८९.७% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. याशिवाय संगणक शाखेतील सालेव स्तुती हिला ८८.८%, इलेक्ट्रिकल शाखेतील समर्थ राऊत याला ८४% व वाघ तुषारी हिला ७३%, सिव्हिल इंजिनीअरिंग शाखेतील खुशी रस्कर हिला ८६%, पवार विश्वजीत याला ८१% व स्वराज खरपुडे याला ७६% गुण मिळाले. मेकॅनिकल शाखेतील श्रेयश कल्याणम याने ८०%, भास्कर दासरी याने ७८% आणि रोहित कोक्कुळ याने ७५% गुण मिळवत चांगली कामगिरी केली. विशेष उल्लेखनीय म्हणजे संगणक शाखेतील पहिल्या वर्षाच्या वैष्णवी जगताप हिने गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेच्या प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन केले. त्यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांच्या कठोर परिश्रमाचे आणि समर्पणाचे हे फळ असून त्यांचे यश पाहून आम्हाला अभिमान वाटतो. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेच्या वतीने त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा.'' या घवघवीत यशामागे संस्थेचे शैक्षणिकदृष्ट्या सकारात्मक वातावरण, आधुनिक पायाभूत सुविधा आणि अनुभवी प्राध्यापकांचे मार्गदर्शन हे मुख्य घटक आहेत. डॉ. एन. जे. पाऊलबुधे पॉलिटेक्निक तांत्रिक शिक्षणातील गुणवत्ता आणि व्यावसायिक नैपुण्य वृद्धिंगत करणाऱ्या शिक्षणासाठी सदैव प्रयत्नशील असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास प्राधान्य देणारी अग्रगण्य संस्था म्हणून ओळखली जाते.



## आ. पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीचे श्रीगोंदा येथील आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपण मोहिमेचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेत या कार्यास हातभार लावला.

या प्रसंगी मिनर्व्हा इन्फ्राचे इंजि. अनिस शेख, माजी समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी, विद्यमान नगरसेवक असिफ सुलतान, तसेच सामाजिक कार्यकर्ते मोहसीन बारुदवाले हे उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमानंतर उपस्थितांनी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या व त्यांचा सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत उत्साहात पार पडले असून स्थानिक नागरिकांनीही या उपक्रमाचे कौतुक केले.

## निकृष्ट दर्जाच्या पोषक पावडर विरोधात शिवसेनेचा आव्वाज

### पोषक खाद्य पुन्हा द्यावे सेनेची मागणी




**अहमदनगर । प्रतिनिधी**

नगर शहरातील विविध अंगणवाड्यांमध्ये वितरित केली जाणारी पोषक पावडर ही अत्यंत निकृष्ट दर्जाची असून, पालकांनी ती आपल्या पाल्यांना देण्यास स्पष्ट नकार दिला आहे. पावडरचा दर्जा कमी असल्याने ती अंगणवाड्यांमधून घरी नेली जात नसून थेट कचऱ्याच्या डब्यात फेकली जात असल्याचे दिसून येते. यामुळे शासनाच्या पोषण आहार योजनेचा मूळ उद्देशच फोल ठरत असल्याची खंत शिवसेनेचे आनंद राठोड व गौरव ढोणे यांनी व्यक्त केली. या प्रकाराकडे लक्ष वेधण्यासाठी युवासेना व कामगार सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे मागणी केली आहे की, पूर्वीप्रमाणे गहू, तांदूळ, साखर, चणा, हळद, मीठ, मिरची या स्वरूपातील साहित्यच अंगणवाड्यांमधून वाटप करण्यात यावे. यासंदर्भात युवासेना युवा अधिकारी आनंद भैय्या राठोड यांनी सांगितले की, सध्याचे पावडर स्वरूपातील अन्न न खाण्यायोग्य असून यामुळे बालकांच्या पोषणावर प्रतिकूल परिणाम होतो आहे. याऐवजी पुन्हा एकदा पारंपरिक स्वरूपातील सुकामालाच वितरित करावा. कामगार सेना शहर प्रमुख गौरव भैय्या ढोणे यांनीही या मागणीला दुजोरा दिला असून सांगितले की, सरकारने नागरिकांचा, विशेषतः बालकांचा विचार करून लोकहिताचा निर्णय घ्यावा. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने ही बाब शासन दरबारी मांडण्यात आली असून, लवकरात लवकर योग्य निर्णय घेण्यात यावा, अशी अपेक्षा नागरिकांमध्ये व्यक्त केली जात आहे. अधिक माहितीसाठी पालकांनी आनंद राठोड ९९६०१५५८६९ व गौरव ढोणे ९८२२५२२२२६ यांना संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.



## शैक्षणिक साहित्याने विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार- अमोल बागुल

### विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने विद्यार्थ्यांना वह्यावाटप

**अहमदनगर । विजय मते**

शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करताना सामाजिक बांधिलकी आणि शिक्षणाविषयीची जाणीव निर्माण करणे हे आपल्या कर्तव्याचे एक अंग आहे. विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी छोटासा हातभार लावण्याच्या हेतूने विनायकराज प्रतिष्ठानच्या वतीने सावेडी येथील समर्थ विद्या मंदिर प्रशालेत १५० विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देण्याची संधी मिळते, असे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते आणि समाजसेवक अमोल बागुल यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमात विनायकराज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष विनय वाखुरे, अतुल देव्हारे, पांडुरंग कोलते, मृगांक मुळे, मयूर कुलकर्णी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता जोशी व कानडे सर यांची उपस्थिती होती. अमोल बागुल यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''विनायकराज प्रतिष्ठानने राबवलेला हा उपक्रम समाजासाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे. समाजाप्रती जबाबदारीची भावना ठेवून प्रत्येकाने अशा उपक्रमात सहभागी होणे गरजेचे आहे. शालेय साहित्याच्या उपलब्धतेबरोबरच सामाजिक संवेदनशीलतेचाही सकारात्मक संदेश अशा उपक्रमातून समाजात पोहोचतो.'' कार्यक्रमाच्या शेवटी शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता जोशी यांनी प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त करत सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणारा हा उपक्रम निश्चितच कौतुकास्पद आहे.



## सीए स्थापना दिनानिमित्त सीएंचा सत्कार

### भाजपा सावेडी मंडलाच्या वतीने कार्यक्रम

अहमदनगर । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टीच्या सावेडी मंडळाच्या वतीने सीए स्थापना दिवसाच्या निमित्ताने स्थानिक सीए शाखेच्या पदाधिकाऱ्यांचा गौरव समारंभ आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विविध पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्य अध्यक्षस्थानी भाजपा सावेडी मंडळाचे अध्यक्ष सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे होते. त्यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत करताना सांगितले की, चार्टर्ड अकाउंटंट हे आर्थिक व्यवस्थेचे मजबूत आधारस्तंभ आहेत. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शारदा होशिंग यांनी सांगितले की, सीए हा व्यवसाय नैतिकतेवर चालतो. सचोटी, प्रामाणिकपणा आणि कष्ट यामुळेच सीए समाजात विश्वासार्हता निर्माण करतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, 'सीएची सही ही पंतप्रधानांच्या सहीपेक्षाही अधिक महत्त्वाची असते.' भाजपा प्रदेश महिला सचिव गीता गिल्डा यांनी देखील मनोगत व्यक्त करत सीए व्यवसायाचे समाजातील महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात सीए शाखेचे अध्यक्ष प्रसाद पुराणिक, उपाध्यक्ष अभयकुमार कटारिया, सचिव महेश तिवारी, कोषाध्यक्ष महेश भळगट, तसेच सदस्य सुनंदा रच्चा, चांसी आगरवाल, सुजय पानसरे, सोमनाथ जाधव यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी भाजपा महिला मोर्च्याच्या श्वेता पंधाडे, ज्योती दांडगे, कालिंदी केसकर, सुजाता औटी, वंदना पंडित, राखी आहेर, अर्चना बनकर, श्वेता कुलकर्णी, वैभव झोटिंग, राजू मंगलारप यांचीही उपस्थिती होती.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# महाराजस्व अभियानातून ४२ लाभार्थ्यांना दाखले वाटप

**नेवासा । विजय खंडागळे**

महसूल विभागाच्या वतीने सोनई मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाच्या शिबिरात ४२ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांतील दाखले वाटप करण्यात आले. १०० दिवसीय महाराजस्व अभियानांतर्गत राबवण्यात आलेल्या या शिबिरात उत्पन्न दाखले, जातीचे दाखले, पोटखराबा, वर्ग २ चे वर्ग १ मध्ये रूपांतर, जिवंत सातबारा, संजय गांधी योजना, मानीव बिनशेती, रहिवासी प्रमाणपत्र, रेशन कार्ड व जमीन संबंधित समस्या आदी बाबींचा समावेश होता. या उपक्रमाचे उद्घाटन नेवासा तालुक्याचे तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रावणबाळ मातापिता संघाचे अध्यक्ष राजेंद्र निंबाळकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार संदीप चिंतामणी, पुरवठा निरीक्षक सुदर्शन दुर्योधन उपस्थित होते.

तहसीलदार डॉ. बिरादार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, राज्य शासनाच्या वतीने ग्रामीण भागातील नागरिकांसाठी वर्षातून चार वेळा महाराजस्व अभियान राबवण्यात येणार असून, याद्वारे शासनाच्या विविध योजनांचे लाभ व आवश्यक दाखले थेट गावपातळीवर देण्यात येणार आहेत. आज सोनई मंडळात पहिल्यांदा हे शिबिर राबवले असून भविष्यात मोठ्या प्रमाणावर याचा प्रचार-प्रसार करून अधिक नागरिकांपर्यंत या योजनांचा लाभ पोहोचवण्यात येईल. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सोनई सोसायटी हॉलमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. प्रास्ताविक करताना नायब तहसीलदार संदीप चिंतामणी यांनी सांगितले की, सोनई मंडळातील नागरिकांनी श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, इंदिरा आवास योजना यांचा लाभ घ्यावा. सध्या या योजनांमध्ये १५ टक्के आधार लिंकिंगचे काम प्रलंबित असून, नागरिकांनी सेतू केंद्रामार्फत आधार लिंक करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पुरवठा निरीक्षक सुदर्शन दुर्योधन यांनी सांगितले की, ४४ हजार रुपयांखाली उत्पन्न असलेल्या पात्र नागरिकांना रेशन कार्डाद्वारे धान्य वाटपाचा लाभ मिळू शकतो. सध्या नेवासा तालुक्याचा मंजूर कोटा १ लाख ९१ हजार ४०० लाभार्थ्यांचा असून, ९०० नवीन अर्ज प्रलंबित आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष राजेंद्र निंबाळकर यांनी मोठ्या उत्पन्नाचे नागरिक व मोठे शेतकरी यांनी आपली रेशन सुविधा स्वेच्छेने सरेंडर करावी, जेणेकरून खऱ्या अर्थाने गरजूंना दोन वेळचे अन्न उपलब्ध होईल. हेच खरे पुण्याचे कार्य आहे, असे ते म्हणाले. कार्यक्रमासाठी सोनईचे मंडळ अधिकारी प्रशांत कांबळे, तलाठी सतीश पवार, तलाठी दत्ता माकोने, सुभाष राख, अरुण दरंदले, पत्रकार विजय खंडागळे, अशोक भुसारी, संदीप दरदले, कोतवाल सुरेश साळवे, नानासाहेब साळवे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते सुभाष राख यांनी केले तर आभार सतीश पवार यांनी मानले.

# कृषी व डॉक्टर दिनानिमित्त शेतकरी-डॉक्टर सन्मान सोहळा

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पाथर्डी । प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री व हरित क्रांतीचे शिल्पकार वसंतराव नाईक यांनी राज्यात कृषी क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवून आणले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे पाथर्डी तालुक्याच्या पूर्व भागातील कुत्तरवाडी पाझर तलाव साकार झाला, जो आज या भागासाठी वरदान ठरला आहे. तलावामुळे परिसर सुजलाम सुफलाम झाला आहे. ही स्व. वसंतराव नाईक यांची या भागाला दिलेली मोलाची देणगी असल्याचे प्रतिपादन शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड यांनी केले. कृषी दिन व डॉक्टर दिनाचे औचित्य साधून चिंचपूर इचदे येथील जवाहर विद्यालयात शेतकरी व डॉक्टर सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मारुती दहिफळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी रामनाथ कराड, डॉ. राहुल वेलदे, सरपंच पुष्पा मिसाळ, निलेश फुंदे, रवींद्र खेडकर, मुख्याध्यापक गीता खेडकर, शिक्षक धनश्री शिरसाट आदी उपस्थित होते. यावेळी विद्यालयातील भारत टॅलेंट सर्च व बालबोधिनी, प्राथमिक, प्रवेशिका, सुबोध या हिंदी परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पुढे बोलताना कराड म्हणाले, स्व. नाईक साहेबांचे पाथर्डी तालुक्यावर विशेष प्रेम होते. दुष्काळाच्या काळात त्यांनी रोजगार हमी योजनेंतर्गत राबवलेल्या कामांमुळे अनेकांच्या हाताला काम मिळाले. रस्ते, तलाव, बंधारे यांसारख्या पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. त्याचा परिणाम पुढील पिढ्यांवर झाला असून, आज अनेक तोडणी मजुरांच्या मुलांनी डॉक्टर, इंजिनिअर होण्याचा मान मिळवला आहे. केवळ हरित क्रांतीच नव्हे, तर शैक्षणिक क्रांतीसुद्धा या भागात घडली आहे. या शैक्षणिक परिवर्तनात मुख्याध्यापक गीता खेडकर व सर्व शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे, असेही कराड यांनी नमूद केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अंबादास सोनपुरे, दादासाहेब पालवे, रामदास दहिफळे, सुनील खेडकर या शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ प्रकल्पग्रस्त भरती जाहिरातीस मुदतवाढ

**राहुरी । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या कार्यक्षेत्रातील अहिल्यानगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर आणि सोलापूर या जिल्ह्यांमधील प्रकल्पग्रस्त कुटुंबातील उमेदवारांसाठी विद्यापीठाच्या प्रकल्पाकरिता सरळसेवेने भरावयाच्या रिक्त पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ज्यांच्या प्रत्यक्षात जमिनी विद्यापीठ प्रकल्पासाठी संपादित झाल्या आहेत, अशा पात्र प्रकल्पग्रस्त उमेदवारांना संधी देण्यासाठी ता. ३१ डिसेंबर २०२४ रोजी भरतीसंदर्भात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सुरुवातीला अर्ज सादर करण्यासाठी ता. ३० जानेवारी २०२५ पर्यंतची मुदत देण्यात आली होती. त्यानंतर मुदतवाढ देत ही तारीख ता. २४ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली. मात्र, काही उमेदवारांना मुदतीत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे त्यांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांकडे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज सादर केल्याचे पुरावे (पोहोच पावत्या) अर्जासोबत जोडून दिले होते. त्यामुळे अशा उमेदवारांना ता. ३० जून २०२५ पर्यंत प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र सादर करण्याची अंतिम संधी देण्यात आली होती. ता. ३० जून २०२५ रोजी मा. कृषीमंत्री यांच्या मंत्रालयातील दालनात झालेल्या बैठकीनंतर महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारांना गट क व गट ड या दोन्ही गटांतील पदांसाठी अर्ज करण्याची मुभा देण्यात आली आहे. त्यासाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ता. ७ जुलै २०२५ अशी निश्चित करण्यात आली आहे. या तारखेपर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त होणाऱ्या अर्जांचाच विचार करण्यात येणार आहे. ता. ७ जुलै २०२५ नंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपालाच्या विलंबाबाबत विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, तसे अर्ज अपात्र ठरवले जातील. त्यामुळे सर्व प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी विहित मुदतीत व आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा, असे आवाहन महात्मा फुले कृषि विद्यापीठ प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



# इंदिरा गांधी पॉलिटेक्निकला राज्य तंत्रशिक्षण मंडळाकडून अति उत्कृष्ट श्रेणी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

बेलवंडी (शुगर) येथील श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या इंदिरा गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयातील सिव्हिल, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, सायबर सिक्युरिटी आणि ॲडव्हान्स डिप्लोमा इन सीएनसी मशीन या शाखांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने 'अति उत्कृष्ट' आणि 'अति उत्तम' श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या देखरेख समितीने नुकतीच महाविद्यालयास भेट देऊन तेथील शैक्षणिक कामकाज, पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, अध्यापन पद्धती व प्रशासकीय प्रक्रिया यांची तपासणी केली. त्यानंतर महाविद्यालयाच्या गुणवत्तेची दखल घेत संबंधित शाखांना ही श्रेणी देण्यात आली. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, उपाध्यक्ष बाबासाहेब भोस, सर्व संचालक मंडळ व निरीक्षक सचिन लगड यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य, विभागप्रमुख, सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत भोईटे, अकॅडमिक कोऑर्डिनेटर संदीप नातू, विभागप्रमुख हवालदार, इथापे , शिंदे यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्यांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच हे यश मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

# ग्रामपंचायत अधिकारी हरिष गडाख यांच्या जन्मदिवसानिमित्त सर्व रोगनिदान व उपचार शिबीर

**संगमनेर प्रतिनिधी । नितीनचंद्र भालेराव**

उद्या गुरुवार दि.०३जुलै २०२५ रोजी हिवरगाव पावसाचे ग्रामपंचायत अधिकारी हरीष गडाख यांच्या वाढदिवसा निमित्त मोफत नेत्र तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.आनंदऋषीजी नेत्रालय अहिल्यानगर यांच्या कडून मोफत नेत्र तपासणी व उपचार आणि प्रथम १०० नेत्र तपासणीधारकांना त्यांच्या आवश्यकते नुसार चष्मा साहित्य वितरीत करण्यात येणार आहे. तसेच श्री.भानुदासजी डेरे आयुर्वेदिक हॉस्पिटल यांचेकडील तज्ञ डॉक्टरांन मार्फत सर्व रोग निदान व मोफत उपचार करण्यात येणार आहे.

हिवरगाव पावसाचे ग्रामपंचायत अधिकारी हरीष गडाख यांच्या वाढदिवसा निमित्त संगमनेर तालुक्यातील आधार रक्तपेढी यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व ग्रामस्थांनी सदर मोफत नेत्र तपासणी व उपचार पद्धतीचा व साहित्य वितरणाचा तसेच सर्व रोग निदान व मोफत उपचार पद्धतीचा व भव्य रक्तदान शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन सरपंच सुभाष गडाख,उपसरपंच सुजाता दवंगे,सामाजिक कार्यकर्ते गणेश दवंगे,केशव दवंगे यांच्या सह हिवरगाव पावसा ग्रामपंचायत सदस्य,कर्मचारी वर्ग,सर्व संस्था पदाधिकारी यांच्या सह ग्रामस्थ यांनी केले आहे.

# मुख्य शेतकी अधिकारी विजय फाटके यांना बेस्ट ॲग्रीकल्चरल ऑफिसर पुरस्कार जाहीर

**नेवासा । प्रतिनिधी**

मुळा सहकारी साखर कारखान्याचे मुख्य शेतकी अधिकारी विजय फाटके यांची 'भारतीय शुगर' या संस्थेच्या वतीने दिला जाणारा 'बेस्ट एग्रीकल्चरल ऑफिसर' पुरस्कारासाठी निवड झाली आहे. हा पुरस्कार ता. १८ जुलै रोजी कोल्हापूर येथे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे. विजय फाटके हे गेल्या ३० वर्षांपासून मुळा साखर कारखान्यात सेवा बजावत असून, मागील १० वर्षांपासून ते मुख्य शेतकी अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपल्या सेवेला सुरुवात ॲग्री ओव्हरसीयर पदावरून केली होती. पुढे पदोन्नती होत त्यांनी मुख्य शेतकी अधिकारी पदाची धुरा यशस्वीरित्या सांभाळली आहे. तसेच, मुळा सहकारी साखर कारखाना कामगार पतपेढीचे ते व्हाइस चेअरमन पदही सध्या भूषवत आहेत. या पुरस्काराची घोषणा होताच मुळा उद्योग समूहाचे संस्थापक माजी खासदार यशवंतराव गडाख, माजी मंत्री शंकरराव गडाख, उदयन गडाख, तसेच



कार्यकारी संचालक शरद बेल्हेकर, जनरल मॅनेजर शंकर दरंदले, सचिव रितेश टेमक, युनियन अध्यक्ष अशोक पवार, राज्य संघटनेचे सरचिटणीस डी. एम. निमसे, पतसंस्थेचे व्यवस्थापक विजय गोरे आणि सोनई परिसरातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# लेखी आश्वासनानंतर बनावट ॲप घोटाळा प्रकरणी उपोषण मागे

**नेवासा । विजय खंडागळे**

शनिशिंगणापूर येथे बनावट ॲप, बनावट देणगी पावती पुस्तके आणि कोडच्या माध्यमातून झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्याच्या पार्श्वभूमीवर ठोस कारवाई व्हावी, या मागणीसाठी काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी शनिशिंगणापूर देवस्थान आवारात आमरण उपोषण सुरू केले होते. अनेक तक्रारी करूनही समाधानकारक कारवाई न झाल्याने त्यांनी हे तीव्र आंदोलन छेडले. या आंदोलनाला लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने अखेर माळवदे यांनी उपोषण मागे घेतले. या प्रकरणात देवस्थानच्या अधिकृत ॲपऐवजी काही पुजारी व कर्मचाऱ्यांनी खाजगी बनावट ॲप तयार करून, बनावट कोड व पावती पुस्तकांचा वापर करत देणग्या थेट खाजगी खात्यांत वर्ग केल्याचा आरोप आहे. यामुळे देवस्थानचा मोठा आर्थिक तोटा झाला असून, शनिभक्तांचीही फसवणूक झाली आहे. याविरोधात संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक आणि धर्मदाय उपायुक्त यांच्याकडे तक्रार दिली होती. या घोटाळ्याची चौकशी व्हावी, देवस्थानने नोंदवलेल्या तीन ॲप व्यतिरिक्त सात ते आठ ॲप्सचीही चौकशी करावी, बनावट पावती पुस्तके, कोड आणि कर्मचाऱ्यांच्या बँक व्यवहारांची सखोल चौकशी व्हावी, अशी ठोस मागणी माळवदे यांनी आंदोलनादरम्यान केली होती. पावसाळी अधिवेशनात हा प्रश्न विधानसभेत उपस्थित करणार असल्याची माहिती स्थानिक आमदार विठ्ठल लंघे यांनी दिली आहे.

तसेच काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले देखील हा मुद्दा विधानसभेत मांडणार असल्याचे भ्रमणध्वनीद्वारे कळवले गेले. दरम्यान, मुंबईकडे रवाना झाल्यामुळे पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांच्या मध्यस्थीने लेखी आश्वासन घेतल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. या उपोषणात काँग्रेसचे संदीप मोटे, महिला काँग्रेसच्या शोभा पातारे, शहर काँग्रेसचे अंजुम पटेल, संजय वाघमारे, संभाजी ब्रिगेडचे शेषराव गव्हाणे, भाजपचे दादा घायाळ, संजय होडगर, कानिफ जगताप, शेतकरी संघटनेचे अशोक काळे, हरीश चक्रनारायण, सतीश तऱ्हाळ, विजय गायकवाड, गणपत मोरे यांच्यासह अनेक शनिभक्त सहभागी झाले होते.


# आरटीओ तालुकानिहाय वाहन तपासणी शिबिरांचे वेळापत्रक जाहीर

**अहमदनगर । प्रतिनिधी**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अहिल्यानगर यांच्या मार्फत जुलै ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मोटार वाहन निरीक्षकांचा तालुकानुसार दौरा निश्चित करण्यात आला असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी दिली आहे. शेवगाव व श्रीगोंदा तालुक्यांमध्ये जुलै : ८ व २२, ऑगस्ट : ५ व १९, सप्टेंबर : ९ व २३, ऑक्टोबर : ७ व २८, नोव्हेंबर : ६ व १८, डिसेंबर : ९ व २३. कर्जत व पाथर्डी तालुक्यांमध्ये जुलै : ९ व २३, ऑगस्ट : ६ व २०, सप्टेंबर : १० व २४, ऑक्टोबर : ८ व २९, नोव्हेंबर : ७ व १९, डिसेंबर : १० व २४. पारनेर व जामखेड तालुक्यांमध्ये जुलै : १० व २४, ऑगस्ट : ७ व २१, सप्टेंबर : ११ व २५, ऑक्टोबर : ९ व ३०, नोव्हेंबर : १० व २०, डिसेंबर : ११ व २६.

प्रत्येक तालुक्याचा मासिक दौरा वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे. संबंधित दिवशी शासकीय अथवा सार्वजनिक सुट्टी असल्यास किंवा प्रशासकीय कारणास्तव दौरा रद्द झाल्यास, त्या दिवसाचा दौरा दुसऱ्या सोईस्कर दिवशी घेतला जाईल व त्याची तारीख स्वतंत्रपणे जाहीर केली जाईल. शिबिरात अर्जदारांची अपूर्ण कागदपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्वीकारली जाणार नाहीत. सर्व शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरावे लागेल. दौऱ्याच्या ठिकाणी परराज्यातून आलेली वाहने तसेच बसेसची तपासणी केली जाणार नाही. ज्या तालुक्यात शिबिराचे आयोजन केलेले आहे, त्या तालुक्यातील नागरिकांचेच कामकाज करण्यात येईल. तपासणीस येणाऱ्या सर्व तात्पुरती नोंदणी झालेल्या, परिवहनेतर (Non-Transport) संवर्गातील वाहनांसाठी डिक्लेमर आवश्यक असून, डिक्लेमर नसलेल्या वाहनांची तपासणी केली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# नन्हे फरिश्ते मुळे फुलले हास्य




घरात भांडण होणे, गर्दीत हरवणे, पुण्या - मुंबईसारख्या मोठ्या शहराचे आकर्षण या आणि अशा अनेक कारणांमुळे राज्यातील अनेक मुले पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात दाखल होतात. कुटुंबाशी ताटातूट झालेली ही मुलं पुण्या - मुंबईतील रस्त्यांवर, फुटपाथवर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॉपवर भटकत असतात. भीक मागून पोटाची खळगी भागवत असतात. यातील काही मुले वाम मार्गाला लागतात तर काही मुले असेच अनाथ म्हणून भटकत असतात. तर काही मुलांना गुंड मवाली जबरदस्तीने भीक मागायला लावतात. त्या मुलांचा गुंड मवाली अतोनात छळ करत असतात. या मुलांना पुन्हा स्वगृही पाठवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने (आर पी एफ) नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली. या मोहिमे अंतर्गत एप्रिल आणि मे या दोन महिन्यांच्या कालावधीत मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील वेगवेगळ्या स्थानकांत रेल्वे संरक्षण दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) २३५ मुलांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. ही सर्व मुले १२ ते १५ वयोगटातील आहेत. एकट्या पुणे स्थानकात एप्रिल आणि मे या दोन महिन्यात ५१ मुलांचा शोध घेऊन रेल्वे सुरक्षा दलाच्या विशेष पथकाने (आरपीएफ) या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात दिले. विशेष म्हणजे शोधलेल्या या मुलांमध्ये पोलीस ठाण्यात नोंद नसलेलीही काही मुले आहेत. ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम रेल्वे सुरक्षा दलाकडून मागील सात वर्षांपासून राबवण्यात येत आहे. २०१८ मध्ये ऑपरेशन नन्हे फरिश्ते या मोहिमेची सुरुवात झाली. आपल्या आई वडिलांपासून ताटातूट झालेली, घरातून निघून पुण्या - मुंबई सारख्या मोठ्या शहरात पळून आलेली, हरवलेल्या अल्पवयीन मुला मुलींना पुन्हा आपले आई वडील मिळावेत, त्यांना त्यांचे घर पुन्हा मिळावे यासाठी ही मोहीम राबवली जाते. मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलीस, रेल्वे कर्मचारी यांच्या समन्वयातून ऑपरेशन नन्हे फरिश्ते ही मोहीम राबवली जाते. या मोहिमे अंतर्गत रेल्वे सुरक्षा दलाने रेल्वे डब्यात, रेल्वे स्थानकात किंवा रेल्वेच्या हद्दीत हरवलेल्या किंवा पुण्या - मुंबईत पळून आलेल्या हजारो मुलांची सुटका केली. या मोहिमेमुळे हजारो अल्पवयीन मुलांच्या व त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून आई वडिलांकडून, कुटुंबापासून दुरावलेली हजारो मुले आपल्या आई वडिलांच्या कुशीत सामावली आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी रेल्वे सुरक्षा दलाने विशेष आराखडा तयार केला. रेल्वेच्या हद्दीत ज्या ठिकाणी अल्पवयीन मुले मुली भीक मागत आहेत अशी ठिकाणे पोलिसांनी शोधून काढली. या ठिकाणी पोलिसांनी अतिशय गुप्तपणे कारवाई केली. या मुलांना भीक मागायला लावणाऱ्या रॅकेटचा शोध घेतला आणि त्यांना अटक करून हजारो मुलांची सुटका केली. मानसोपचार तज्ज्ञांची मदत घेऊन या मुलांचे प्रबोधन करण्यात आले. या मुलांच्या पालकांचा शोध घेऊन या मुलांना त्यांच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे मोठे आव्हान रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसांसमोर होते. ते आव्हान पोलिसांनी लीलिया पेलले आहे. ही मोहीम अतिशय स्तुत्य आणि अनुकरणीय अशी आहे. ही मोहीम राबवणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचे जितके कौतुक करावे तितके कमी आहे. रेल्वे सुरक्षा दलाने ही मोहीम राबवून हजारो मुलामुलींना अनाथ होण्यापासून आणि वाम मार्गाला लागण्यापासून वाचवले आहे. ही मोहीम राबवणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना मनापासून धन्यवाद द्यावे लागेल. मुंबई पोलीस दलातर्फे देखील ऑपरेशन मुस्कान नावाची अशीच एक मोहीम राबविण्यात येते. या मोहीमे अंतर्गत देखील हजारो मुलामुलींना त्यांच्या पालकांकडे, कुटुंबाकडे सुपूर्त करण्यात आले आहे. ऑपरेशन नन्हे फरिश्ते, ऑपरेशन मुस्कान या सारख्या मोहिमा फक्त पुण्या - मुंबई पुरत्याच मर्यादित न राहता सर्व महानगरात राबवायला हव्यात म्हणजे बेघर झालेली लाखो मुले स्वगृही परततील आणि स्वगृही परतणाऱ्या या मुलांच्या आणि पालकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलेल.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद



## छावणीकर स्नेहमेळावा संपन्न

# साने गुरुजी स्मारकात दोन दिवसीय विचारमंथन

**रायगड । प्रतिनिधी**

साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक, वडघर, माणगाव येथे छावणी युवा स्नेहमेळावा ता.२८ व २९ जून २०२५ रोजी उत्साहात संपन्न झाला. मुंबई, ठाणे, पुणे, कोल्हापूर, रत्नागिरी, नांदेड येथून माजी छावणीकरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सुरुवात कवयित्री नीरजा यांच्या कविता वाचनाने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राकेश गायकवाड होते. प्रमुख उपस्थिती राजेश कुळकर्णी, प्रमुख पाहुणे संदेश कुळकर्णी होते. राजनभाई इंदुलकर यांनी प्रास्ताविक तर ॲड. विजय दिवाणे यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहमेळावा म्हणजे केवळ भेटीगाठींचा कार्यक्रम नसून, सामाजिक जाणीवा जागवणारा आणि पुढील कार्यदिशा निश्चित करणारा विचारमंच ठरला. सहभागी कार्यकर्त्यांनी आपल्या कार्याचा परिचय करून देत कार्यातील अडचणी आणि त्यावरील उपाय यावर मोकळा संवाद साधला. पुरोगामी विचारांचे अधिष्ठान ही स्मारकाची ओळख असल्याने या मंचाच्या माध्यमातून नव्या पिढीला सामाजिक जबाबदाऱ्या आणि कार्यपद्धती समजावून देण्याचा प्रयत्न झाला. दुसऱ्या सत्रात कवयित्री नीरजा यांच्या 'संस्कृती' या कवितेच्या वाचनानंतर कार्याध्यक्ष राजेश कुळकर्णी यांनी नव्या मंचाचे उद्घाटन केले.

आशुतोष शिर्के यांनी समाजकार्याची सहा सूत्रे मांडली. सेवा, संघर्ष, प्रबोधन, संवाद, निर्माण, निवडणूक या सहा सूत्री कार्यपद्धतीचे महत्त्व अधोरेखित केले. प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या जबाबदाऱ्या समजून घेऊन त्या निभावण्याचे आवाहन त्यांनी केले. सायंकाळच्या सत्रात संस्कृतिक कार्यक्रमात दक्ष रूपवते यांनी आभाळाची लेकरे, साहू पेटी मशाल, पाडू चालारे यांसारखी चळवळीची गाणी सादर केली. सुदर्शन चकाले यांनी डफसह साथसंगत केली. दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजींच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली. पहिल्या सत्रात आशुतोष शिर्के यांनी जनसंघटना, ग्रामपंचायत, संस्था, अभ्यासक यांच्या सामूहिक प्रयत्नांतून सामाजिक न्यायासाठी कार्य कसे शक्य आहे हे समजावून सांगितले. दुसऱ्या सत्रात कार्यकर्त्यांनी स्मारकात स्वयंसेवक म्हणून कसे योगदान देता येईल यावर चर्चा झाली. शुक्लोधन गायकवाड, अजय भोसले, दीपक सोनवणे, दक्ष रूपवते, सुदर्शन चकाले, विनायक साळुंखे, राकेश गायकवाड यांनी आपल्या भूमिका स्पष्ट केल्या. कार्यक्रमात स्मारकाचे अध्यक्ष प्रमोद निगुडकर यांनी, ''प्रश्न हाताळताना आपली मर्यादा आणि शक्ती ओळखणे आवश्यक आहे,'' असे सांगितले. शेवटच्या सत्रात पत्रकार अमेय तिरोडकर यांनी राजकारण, समाजकारण आणि कार्यकर्त्यांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. उपस्थित कार्यकर्त्यांच्या शंका व अडचणींचे निरसनही करण्यात आले. या स्नेहमेळाव्यास माधुरीताई पाटील (खजिनदार), माजी कार्याध्यक्ष राजनभाई इंदुलकर उपस्थित होते. दोन दिवसांच्या कार्यक्रमाचे समन्वयन पत्रकार अश्विनी सातव व ॲड. विजय दिवाणे यांनी केले. स्नेहमेळावा नवचैतन्य, नवउर्जा देऊन कार्यकर्त्यांच्या नव्या प्रवासाची नांदी ठरला.

# जितेश कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**वाशिम । प्रतिनिधी**



वाढदिवस सामाजिक उपक्रमातून साजरा करत सकारात्मकतेचा संदेश देण्याचा स्तुत्य उपक्रम श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम येथे राबविण्यात आला. जितेश कांबळे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

पर्यावरणसंवर्धनाच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एन. शिंदे, एनएसएस वाशिम जिल्हा समन्वयक डॉ. ए. टी. वाघ, डॉ. अतुल राऊत, डॉ. अंभोरे, प्रा. सचिन इंगोले, विभागप्रमुख प्रा. भदरगे, प्रा. डी. एस. गोरे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. आर.एन. इंगोले, प्रा. यू.एस. जमदाडे, प्रा. काकडे, प्रा. यू.एस. बनकर, डॉ. घुगे, सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डी.एस. कव्हर तसेच महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, कर्मचारी आणि कांबळे यांचे मित्र अजय पठाडे आदी मान्यवर उपस्थित होते. ''एक वृक्ष, हजारो आशा!'' या प्रेरणादायी विचाराने आजचा दिवस अधिक अर्थपूर्ण ठरल्याची भावना जितेश कांबळे यांनी व्यक्त केली. त्यांनी आपल्या वाढदिवसाचा उपयोग समाजोपयोगी कार्यासाठी करण्याचा संकल्प यानिमित्ताने अधोरेखित केला. कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीपणे पार पडल्याबद्दल सर्व मान्यवरांचे आणि सहकाऱ्यांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले.

## 'ठाकरे ब्रँड'साठी 'जानवे व शेंडी विरहित हिंदुत्व' येणार असेल तर

# आमच्यासारखे अनेक लोक त्यांच्या मदतीला जायला तयार- सुरेश खोपडे

शिवसेना, कोल्ह्यांच्या कळपाने उद्ध्वस्त केलेली एक सिंहांची संघटना. सिंहासारख्या आक्रमक आदरणीय बाळ ठाकरे यांची शिवसेना मागे वळून पाहताना कशी दिसते? उद्धवजी आणि राजसाहेब एकत्र येऊन ती कुठे घेऊन जाणार? अगर जातील? त्याकाळी ''शिवसेना जिंदाबाद'' अशी घोषणा दिली की, आम्हा तरुणांची छाती भरून येत असे. आम्हा स्थानिकांच्या नोकऱ्या बळकावणाऱ्या मद्रास्यांचा आम्हाला राग होता. ''उठाव लुंगी, बजाव पुंगी'' म्हटलं की, आम्हाला मजा वाटत असे. लांड्यांना, पाकड्यांना धडा शिकवू, गर्व से कहो हम हिंदू है या घोषणेने आमच्या धर्म व राष्ट्रप्रेमाला खत-पाणी घातले जाई. सैतान चौकी, सयानी रोड, परळ या कामगारवस्तीत काही काळ राहिल्याने एका बाजूला गिरणीमालकांची मोठी घरं व दुसऱ्या बाजूला कामगारांच्या चाळी बघून कसंनुस वाटे. या सगळ्यांना सरळ करण्यासाठी बाळ ठाकरे नावाचा माणूस सिंहासारखा वाटे. १९७०, साली भिवंडीत घडलेल्या भयानक दंगलीबद्दल आरएसएसच्या लोकांबरोबर बाळासाहेब ठाकरे यांना जस्टीस मादन कमिशन चौकशी अहवालात दुषणे देण्यात आली होती. १९८४ दंगलीमध्ये तसाच दोष देण्यात आलेला होता. अयोध्येमध्ये बाबरी मशीद पाडण्यासाठी पुढाकार घेणाऱ्या लालकृष्ण आडवाणी, नरेंद्रजी मोदी यासह सर्वांनी कोर्टापुढे शेपूट घातले, पण एकटे बाळासाहेब म्हटले की, मशिद उध्वस्त करण्यासाठी भाग घेणाऱ्या शिवसैनिकांचा मला अभिमान आहे. ९३ १९९२-९३ मुंबई दंगलीची चौकशी करणाऱ्या श्रीकृष्ण कमिशनने देखील बाळ ठाकरे व शिवसेनेला दोष दिलेला होता. जनसंघ भाजप नेते मातोश्रीवर जाऊन बाळासाहेबांचे आशीर्वाद घेत. कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसताना बाळ ठाकरे आम्हा हिंदूंचे हिंदूहृदयसम्राट बनले.

लोकशाही ऐवजी ठोकशाहीची भाषा करणाऱ्या बाळासाहेब यांनी शिवसेनेचा मुख्यमंत्री महाराष्ट्राला दिला. तो हिंदू मुख्यमंत्री एवढा पावरफुल होता की, त्याने आमच्या गणरायाला दूध प्यायला भाग पाडले! आणि युती नावाचे एक राजकीय मॉडेल महाराष्ट्राला दिले. छत्रपती शिवराय, सीमाप्रश्न, हुतात्म्यांच बलिदान, मुंबई गुजरातला देणार नाही, मराठी अस्मिता असा नारा देणाऱ्या बाळासाहेबांनी एके दिवशी आपल्या मुलाला व नातवाला स्टेजवर उभे केले. भरसभेत जनतेला लोटांगण घातले आणि उद्धव आणि आदित्य यांना सांभाळा अशी विनवणी महाराष्ट्र जनतेपुढे केली. करोडो शिवसैनिक असताना त्यांना आपल्या कुटुंबाची काळजी का वाटली? त्यामागे लोकशाही, ठोकशाही, घराणेशाही, की मानव उत्क्रांतीमधील टोळीशाही होती, याचा यथावकाश शोध घेऊया.



सुरेश खोपडे

समाजसंवाद

मराठासह बहुजनातील प्रस्थापितांनी राजकीय सत्ता आपल्या घरात डांबून ठेवल्यावर बाळासाहेबांनी त्यांच्यातील रिक्षावाला, पानटपरीवाला, कुक्कुटपालनवाला, भाजीपाला विक्रेता अशा महत्वकांक्षी तरुणांना हाताशी धरले. हिंदूधर्म न समजता ते कडवे हिंदुत्ववादी बनले.

बाळासाहेबांच्यानंतरयाच शिवसैनिकांनी त्यांच्या घरातून पक्ष, धनुष्यबाण, त्यांचा फोटो पळवून नेला. हे असे का घडले? हे समजून घेण्यासाठी राजकीय विचारवंत निकोलाव मॅकीवेली यांनी मांडलेले विचार लक्षात घेवू या. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना बाळ ठाकरे हे यशस्वी कसे झाले याचे उत्तर त्यांच्या द प्रिन्स या पुस्तकात सापडेल. ''राजपुत्रांनो, तुम्हाला सत्ता हवी असेल तर तुम्ही प्रामाणिक, दानशूर, धार्मिक, दयाळू, प्रेमळ, विद्वत्तापूर्ण असले पाहिजे. पण एका माणसामध्ये हे सर्व सद्गुण असणे शक्य नाही. तरीपण तुम्ही ढोंग करा की तुमच्यामध्ये हे सर्व गुण आहेत. राजपुत्रांनो, तरीही हे सर्व मानवीगुण सत्ता मिळविण्यासाठी पुरेसे नाहीत. त्यासाठी तुम्हाला काही प्राण्यांचे गुण घ्यावे लागतील. तुमच्या विरोधकांचा काटा काढण्यासाठी तुम्हाला सिंहासारखे क्रूर बनावे लागेल.''

आदरणीय बाळासाहेब ठाकरे सिंहासारखे आक्रमक वागल्याचे दिसून येते. तो पुढे म्हणतो, सत्ता मिळविण्यासाठी आणि टिकविण्यासाठी सिंहासारखे क्रूर बनणे एवढेच पुरेशी नाही. सिंहाला विरोधकाने लावलेले सापळे ओळखता येत नाहीत आणि म्हणून त्यासाठी तुम्हाला कोल्ह्यासारखे धूर्त बनाव लागेल.

बाळासाहेब आणि त्यानंतरची पिढी हे सापळे ओळखण्यात अपयशी ठरलेली तर नाही ना? हो. ते त्यांना ओळखता आले नाही! एकेकाळी प्रमोद महाजनसारखे आर्य ब्राह्मण धूर्त राजकारणी मातोश्रीवर बाळासाहेबांच्या पायाशी बसून चर्चा करत. तर त्यांचीच परंपरा चालविणाऱ्या देवेंद्र फडणवीस या ब्राह्मणाने बहुरुप्याचे सोंग घेत याच शिवसेनेच्या स्वार्थी, शिवसैनिकांना हाताशी धरून शिवसेना फोडली, पक्ष चिन्ह, पक्षाचा ध्वज आणि बाप ही पळविला. हे सगळे शिवसैनिक मावळे एका धूर्त आणि तेवढ्याच लबाड कावेबाज कोल्ह्याने फितविले. आपल्या बाजूला नेले.

ठाकरे ब्रँड कायम ठेवण्यासाठी सरसावलेल्या उद्धवजी व राजसाहेब या दोघा बंधूंना या कोल्ह्यांच्या आणि त्याच्या बिरादरीच्या करामत माहित आहेत. पण अशा करामती कश्या छेदायच्या याची माहिती आहे का? आणि ती माहिती वापरायची हिम्मत त्यांच्यामध्ये आहे का ? ठाकरे ब्रँडची आजची ताकद असलेल्या बाबी कोणत्या? बाळासाहेबांच्या पुण्याईमुळे निर्माण झालेली मराठी अस्मिता, रांगड्या शिवसैनिकांची मनगटे, खल्लम खट्याळ करत रस्त्यावर उतरण्यासाठी शिस्तबद्ध फौज. पण आधुनिक प्रशासन एवढ्यावर चालवता येणार नाही व त्याला पुढील दिशाही देता येणार नाही. खरेतर ''आम्हाला जानवे शेंडीचे हिंदुत्व मान्य नाही'' असे जाहीर केल्याबरोबर आम्ही उद्धव साहेबांचे चाहते बनलो. आजही त्यांनी जाहीर केलेले हिंदुत्व हे जानव्या शेंडी शिवाय नवीन पद्धतीने उभे कसे करायचे याचे कौशल्य त्यांचेकडे कितपत आहे हा प्रश्न उरतोच. ठाकरे ब्रँडसाठी जानवे व शेंडी विरहित हिंदुत्व येणार असेल तर आमच्यासारखे अनेक लोक त्यांच्या मदतीला जायला तयार आहोत. सत्तेवर आल्यावर प्रशासन चालवताना कोल्ह्यांचा कावा कसा ओळखायचा व कोल्ह्याला त्याची जागा कशी दाखवायची याबद्दल आम्ही सांगू शकू. कसे ते बोलू या सवडीने.